# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अंतर्गत भारतीय ज्ञानपरंपरा व आधुनिक ग्रंथालयशास्त्र शिक्षण : कोनएक संयुक्त दृष्ट

**वैशाली उगले**
श्रीकृष्णदासजाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय
पिपरी – वर्धा

---

***सारांश :***

*भारतीय शिक्षणव्यवस्थेत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 हे एक महत्वाचे पाऊल असून शिक्षण प्रणालीला बहुविषयक, समाजाभिमुख आणि संस्कृतिसंपन्न करण्यावर त्याचा भर आहे. ग्रंथालय व माहितीशास्त्र (LIS) शिक्षण हे आजपर्यंत तंत्रज्ञान, ICT व डिजिटलायझेशन केंद्रित राहिले आहे. तथापि, भारतीय ज्ञानपरंपरेचा (IKS) समावेश व सामाजिक शास्त्रांचा सहभाग LIS शिक्षण अधिक समाजाभिमुख व मूल्यनिष्ठ करण्यास महत्त्वपूर्ण ठरतो. या लेखात LIS शिक्षणाची वर्तमानस्थिती, NEP 2020 चे प्रभाव, सामाजिक शास्त्रांची भूमिका व IKS चा समावेश यांचा अभ्यास करून LIS शिक्षणातील सुधारणा व शिफारसी मांडल्या आहेत.*

**कीवर्ड्स :** LIS शिक्षण, भारतीय ज्ञानपरंपरा (IKS), राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, सामाजिक शास्त्र, समाकलन

---

**प्रस्तावना :**

भारतीय शिक्षणव्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे. या धोरणात शिक्षणाच्या सर्वांगीण, बहुविषयक आणि मूल्याधिष्ठित दृष्टिकोनावर विशेष भर देण्याचा प्रयत्न करण्यातआल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांचा केवळ पुस्तकी ज्ञानापुरता मर्यादित न राहता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास, सृजनशीलतेचा विस्तार आणि भारतीय संस्कृती व मूल्यांची ओळख होणे हा या धोरणाचा मूलभूत हेतू आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालय व माहितीशास्त्र हे ज्ञानाचे संकलन, व्यवस्थापन आणि प्रसारण यावर केंद्रित असल्याने आजपर्यंतचा अभ्यासक्रम प्रामुख्याने तंत्रज्ञानाचा वापर, ज्ञानव्यवस्थापन, डिजिटल ग्रंथालये यावर आधारित राहिला आहे. या शिक्षणक्षेत्राला अधिक समाजाभिमुख, संस्कृतिसंपन्न आणि जागतिक स्तरावर उपयुक्त करण्यासाठी भारतीय ज्ञानपरंपरेचे (Indian Knowledge System - IKS) समाकलन आणि सामाजिक शास्त्रांच्या साहाय्याने सहकार्यात्मक अभ्यासक्रमाची मांडणी होणे आवश्यक आहे.यामुळे LIS शिक्षणात केवळ तांत्रिक व माहितीविषयक कौशल्येच नव्हे, तर सामाजिक जाण, सांस्कृतिक मूल्ये आणि सर्वांगीण शैक्षणिक दृष्टिकोन विकसित होऊ शकतो. भारतीय ज्ञानपरंपरा उपनिषदे, वेद, आयुर्वेद, योग,

खगोलशास्त्र, गणित, संगीत, वास्तुशास्त्र, लोकपरंपरा यामध्ये समृद्ध आहे. त्यामुळे LIS अभ्यासक्रम अधिक व्यापक , समाजाभिमुख आणि मूल्यनिष्ठ स्वरूप धारण करेल.

भारतातील ग्रंथालय व माहितीशास्त्र (LIS) शिक्षणाची सुरुवात 1911 साली स्थानिक गरजांवर आधारित झाली. 1950–60 च्या दशकात त्याचा विकास मुख्यत्वे माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT), डिजिटलायझेशन, माहिती व्यवस्थापन आणि नॉलेज मॅनेजमेंट सारख्या संकल्पांवर आधारित झाला. आजही ग्रंथालयशास्त्रात भारतीय ज्ञानसंपदेचा अभ्यासक्रमातील समावेश कमी प्रमाणात दिसून येते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 अधिक व्यापक करण्यासाठी कौशल्य आधारित अभ्यासक्रम, बहुविषयकता, संस्कृतीचे संवर्धन , स्थानिक भाषा , डिजिटल साक्षरता आणि भारतीय ज्ञानसंपदेचा समावेश या घटकांवर विशेष भर देण्याचा प्रयास करीत आहे. या धोरणामुळे शिक्षण केवळ तांत्रिक मर्यादित न राहता विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक जाणिव आणि सांस्कृतिक परिचय यांचा समन्वय साधण्यास मदत करेल. याशिवाय, सामाजिक शास्त्रांचा अभ्यास LIS शिक्षणात समाविष्ट केल्यास, विद्यार्थ्यांना माहितीशास्त्राचे समाजाशी असलेले नाते, सांस्कृतिक विविधता, नैतिकता आणि सामाजिक मूल्ये अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता येईल व त्यामुळे LIS अभ्यासक्रम अधिक समाजाभिमुख, संस्कृतीसंवर्धक आणि मूल्यनिष्ठ बनण्याची क्षमता प्राप्त करतो.

**संशोधन उद्दिष्टे :**

या शोधनिबंधाचा मुख्य हेतू LIS शिक्षण अधिक समाजाभिमुख, संस्कृतिसंपन्न आणि मूल्यनिष्ठ करण्यासाठी उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

- LIS अभ्यासक्रमात भारतीय ज्ञानपरंपरेचे समाकलन कितपत शक्य आहे याचा सखोल अभ्यास
- सामाजिक शास्त्रांचा अभ्यासक्रमात सहकार्यात्मक सहभाग
- भारतीय ज्ञानपरंपरेचे समाकलन, NEP 2020 ची चौकट आणि सामाजिक शास्त्रांचा सहभाग या प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या संधी व आव्हानांचा शोध

**LIS शिक्षणाची वर्तमान स्थिती :**

भारतातील ग्रंथालय व माहितीशास्त्र ( LIS) शिक्षण हे काळानुरूप बदलत असले तरी त्याची रचना आणि स्वरूप प्रामुख्याने पाश्चात्त्य संकल्पनावर आधारित असल्याने या अभ्यासक्रमात स्थानिक गरजा, सांस्कृतिक संदर्भ व वारसा आणि भारतीय ज्ञानपरंपरेचा विचार फारसा झालेला दिसत नाही.

सध्याच्या अभ्यासक्रमात आधुनिक तंत्रज्ञानाला महत्व दिले गेले आहे. विशेषतः माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT), ज्ञान व्यवस्थापन आणि डिजिटल ग्रंथालये यावर अधिक भर दिला जातो. यामुळे विद्यार्थ्यांना तांत्रिक आणि माहिती हाताळणीची कौशल्य प्राप्त होते. या शिक्षणात सामाजिक शास्त्रांचा अभ्यास मर्यादित असल्याचे दिसते. सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांचा विचार अभ्यासक्रमात फारसा आढळून येत नाही. तसेच, भारतीय ज्ञानपरंपरेचा (Indian Knowledge System - IKS) समावेश अत्यल्प असल्यामुळे

LIS शिक्षण समाजाभिमुख आणि संस्कृतिसंपन्न होण्यात अडथळे निर्माण होतात.

यावरून असे स्पष्ट होते की, LIS शिक्षणाची आजची स्थिती तांत्रिक प्रगतीशी सुसंगत असली तरी त्यात समाजाभिमुखता आणि भारतीय संस्कृतीचा ठसा उमटवण्यासाठी सुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच अभ्यासक्रमामध्ये खालीलबाबींचा समावेश होणे गरजेचे आहे.

- **रोजगाराभिमुख शिक्षण :** LIS अभ्यासक्रम तांत्रिक दृष्टीने प्रगत असला तरी उद्योगक्षेत्र, संशोधन संस्था आणि समाजाच्या बदलत्या गरजांना अनुरूप कौशल्ये विकसित केल्याने रोजगाराच्या संधी विद्यार्थ्यास उपलब्ध होतील.
- **स्थानिक भाषा व संदर्भांचा वापर :** इंग्रजीवर आधारित अध्यापन व अभ्यास साहित्य असल्याने स्थानिक भाषांमधील माहिती साधने आणि स्थानिक संदर्भाचा उल्लेख कमी आहे. त्यामुळे स्थानिक भाषांमध्ये साहित्य प्रकाशित होणे गरजेचे आहे.
- **संशोधन संस्कृतीची मर्यादा :** LIS क्षेत्रात संशोधन कार्य प्रामुख्याने पाश्चात्त्य सैद्धांतिक चौकटीवर अवलंबून असल्याने भारतीय ज्ञान, ग्रंथपरंपरा व स्थानिक गरजांवर आधारित संशोधन कमी असल्याचे दिसून येते. त्यामुळे भारतीय संस्कृतीवर आधारित संशोधन कार्य होणे आवश्यक आहे.
- **विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक कौशल्य वाढविणे :** विद्यार्थांना डिजिटल साधनांचा वापर कसा करावा हे शिकवले जाते, परंतु प्रत्यक्ष ग्रंथालय व्यवस्थापन, समुदायाशी संवाद साधणे, ग्रामीण स्तरावर माहिती साक्षरता वाढविण्याचे कौशल्य विकसित करणे गरजेचे आहे.
- **समाजाभिमुखता शिक्षण :** LIS शिक्षण समाजातील वंचित घटक, ग्रामीण भागातील माहिती गरजा, वाचन संस्कृती संवर्धन वाढविण्यासाठी अभ्यासक्रमामध्ये समाजभिमुख शिक्षण प्रणाली राबविणे गरजेचे आहे.

**NEP 2020 चा LIS शिक्षणावर प्रभाव :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 ने शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत आणि त्याचा परिणाम इतर विषयांबरोबरच ग्रंथालय व माहितीशास्त्र (Library and Information Science – LIS) शिक्षणावरही होत असल्याचे दिसत आहे. पारंपरिक दृष्टिकोनावर आधारित अभ्यासक्रम आता अधिक व्यापक, बहुविषयक आणि भारतीय ज्ञानपरंपरेशी एकत्रित करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहेत.

- NEP 2020 ने बहुविषयक अभ्यासक्रमावर भर दिल्यामुळे LIS विद्यार्थ्यांना सामाजिक शास्त्र, मानवशास्त्र, माहिती तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि भारतीय संस्कृती या विविध क्षेत्रांतील ज्ञान आत्मसात करण्याची संधी उपलब्ध करते.
- कौशल्यकेंद्रित शिक्षणावर भर असल्याने LIS विद्यार्थ्यांना डिजिटल ग्रंथालय व्यवस्थापन, माहिती व्यवस्थापन, डेटा ॲनालिटिक्स, आणि ई-गव्हर्नन्स यांसारख्या नव्या कौशल्यांचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन करते. यामुळे LIS विद्यार्थ्यांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होत आहे.

- NEP 2020 मध्ये स्थानिक भाषा व संस्कृतीच्या जतनाला प्राधान्य दिल्यामुळे ग्रंथालयांचे कार्य अधिक व्यापक झाले आहे. LIS अभ्यासक्रमात प्रादेशिक साहित्य, लोकसाहित्य, मौखिक परंपरा व स्थानिक माहिती संसाधनांचे संवर्धन या घटकांचा समावेश होऊ लागला आहे.
- NEP 2020 ने भारतीय ज्ञानपरंपरेच्या (Indian Knowledge System - IKS) अभ्यासाचे दिशानिर्देश दिल्यामुळे LIS शिक्षणात वेद, उपनिषदे, आयुर्वेद, योग, न्यायशास्त्र, तसेच पारंपरिक ज्ञानसंपदा यांचे दस्तऐवजीकरण व प्रसार करण्याची संधी निर्माण झाली आहे. यामुळे LIS शिक्षण भारतीय संस्कृतीशी अधिक निगडित होऊन जागतिक स्तरावर वैशिष्ट्यपूर्ण ठरेल.

अशा रीतीने, NEP 2020 मुळे LIS शिक्षण केवळ तंत्रज्ञानाधारित न राहता सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक आणि मूल्य आधारित शिक्षण पद्धतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

**सामाजिक शास्त्रांची भूमिका :**

ग्रंथालय व माहितीशास्त्र (Library and Information Science – LIS) शिक्षणात सामाजिक शास्त्राचा अंतर्भाव झाल्यास समाजशास्त्र, इतिहास, मानववंशशास्त्र आणि मानसशास्त्र यांसारख्या शाखांमुळे विद्यार्थ्यांना समाजाभिमुख ज्ञान प्राप्त होते. या शाखांद्वारे विद्यार्थी समाजातील विविध घटक, सांस्कृतिक परंपरा, सामाजिक संरचना आणि मानवी वर्तन समजून घेऊ शकतात.

सामाजिक शास्त्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नैतिकता, सामाजिक जबाबदारी आणि सांस्कृतिक मूल्यांची जाणीव निर्माण होते. विद्यार्थ्यांना केवळ माहिती व्यवस्थापनाचे तांत्रिक कौशल्य नाही तर समाजाच्या गरजा, लोकांच्या माहिती परिणामांची समज आणि सामाजिक संवेदनशीलता याची जाणीव देखील होते.

यामुळे LIS शिक्षणात समाजाभिमुखता येते. ग्रंथालये आणि माहिती केंद्रे केवळ माहिती वितरीत करण्याचे माध्यम नसून, ती समाजाच्या विकासाचे साधन बनतात. सामाजिक शास्त्रांचा अभ्यास विद्यार्थ्यांना समाजाशी जुळलेले, नैतिक दृष्टिकोनातून कार्यक्षम आणि सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील LIS व्यावसायिक घडवितो.

**भारतीय ज्ञानपरंपरेचा अभ्यासक्रमात समावेश :**

ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षणात भारतीय ज्ञानपरंपरेचा (Indian Knowledge System – IKS) समावेश विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. यामध्ये प्राचीन हस्तलिखिते, ग्रंथ आणि सांस्कृतिक दस्तऐवज यांचे डिजिटायझेशन करून त्यांचे जतन व प्रसार करणे समाविष्ट आहे.

विद्यार्थ्यांना स्थानिक आणि पारंपरिक ज्ञानसंपदेचे महत्त्व जाणून घेण्यासाठी भारतीय परंपरेतील पारंपरिक वर्गीकरण व शोध प्रणालींचा अभ्यास माहिती व्यवस्थापनाच्या विविध पद्धती समजून घेण्यास मदत करते. तसेच आयुर्वेद, योग, संगीत, खगोलशास्त्र यांसारख्या भारतीय ज्ञान क्षेत्रातील माहिती संसाधनांचा समावेश LIS

अभ्यासक्रमात केल्यास विद्यार्थ्यांना बहुविध ज्ञान आणि सांस्कृतिक समज प्राप्त होते. केवळ तांत्रिक कौशल्येच नव्हे, तर भारतीय ज्ञानसंपदेची व्यापक ओळख देखील विकसित होते. सोबतच, सांस्कृतिक वारसा माहितीशास्त्र सारख्या विषयांचा समावेश विद्यार्थ्यांना सांस्कृतिक वारसा डिजिटल स्वरूपात व्यवस्थापित करणे, संरक्षित करणे आणि समाजापर्यंत पोहचवणे याची क्षमता प्रदान करते.

**सहकार्यात्मक एकत्रीकरण :**

ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षणात सहकार्यात्मक एकत्रीकरणाचे प्रतिकृती प्रभावी रीतीने राबविल्यास शिक्षण अधिक समृद्ध व समाजाभिमुख होऊ शकते. यासाठी प्रथम LIS व सामाजिक शास्त्र विभागांमधील संयुक्त प्रकल्प आणि कार्यशाळा आयोजित करणे गरजेचे आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञानाबरोबरच समाजशास्त्र, इतिहास, मानववंशशास्त्र आणि मानसशास्त्र यासारख्या शाखांतील ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो.

कौशल्यकेंद्रित शिक्षण व भारतीय ज्ञानपरंपरेवर भर देणाऱ्या लवचिक अभ्यासक्रमामुळे विद्यार्थी विविध विषयांचा अभ्यास करून आपले व्यावसायिक व सामाजिक कौशल्य वाढवू शकतात. त्यामुळे NEP 2020 मध्ये  अभ्यासक्रमाचे लवचिक स्वरूप विकसित करणे गरजेचे आहे.

डिजिटल साधनांचा वापर करून तयार केलेले शैक्षणिक साहित्य, डिजिटल ग्रंथालये, हस्तलिखितांचे संगणकीकरण आणि पारंपरिक ज्ञानसंपदेचे ऑनलाइन वितरण विद्यार्थ्यांसह सर्व समाजासाठी उपयुक्त ठरते. यामुळे ज्ञानाचा मुक्त प्रवाह सुनिश्चित होतो आणि LIS शिक्षणाचा सामाजिक परिणाम वाढतो.

**निष्कर्ष :**

- बहुविषयकता, कौशल्यकेंद्रित शिक्षण, स्थानिक भाषा व संस्कृतीचे संवर्धन यांसारख्या धोरणात्मक मार्गदर्शनामुळे LIS शिक्षण अधिक समाजाभिमुख आणि मूल्याधिष्ठित बनवता येते.
- सामाजिक शास्त्रांचा अभ्यासक्रमात समावेश केल्यास विद्यार्थ्यांच्या संशोधन क्षमतेत वाढ होते तसेच समाजाभिमुख दृष्टिकोन विकसित करण्यास मदत मिळते. सामाजिक शास्त्रांद्वारे विद्यार्थी सांस्कृतिक, नैतिक आणि सामाजिक मूल्यांचा अभ्यास करून LIS सेवांना समाजाभिमुख स्वरूप देऊ शकतात.
- LIS व सामाजिक शास्त्र विभागांतील संयुक्त प्रकल्प, कार्यशाळा, लवचिक अभ्यासक्रम आणि OER निर्मितीमुळे विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक कौशल्ये नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक आणि संशोधनक्षम दृष्टिकोन देखील विकसित होतो.

अशा प्रकारे, भारतीय ज्ञानपरंपरेचा समावेश, NEP 2020 चे मार्गदर्शन आणि सामाजिक शास्त्रांचा सहभाग यांचा सहयोगामुळे LIS शिक्षण अधिक समृद्ध, समाजाभिमुख आणि जागतिक स्तरावर उपयुक्त बनवण्यास मदत करते.

**सुधारणा व शिफारसी :**

- LIS अभ्यासक्रमात भारतीय ज्ञानपरंपरेचा समावेश करणे अत्यावश्यक आहेप्राचीन हस्तलिखिते ., ग्रंथ,

पारंपरिक वर्गीकरण पद्धती, आयुर्वेद, योग, संगीत, खगोलशास्त्र आणि सांस्कृतिक वारसा यांचा अभ्यास विद्यार्थ्यांना बहुआयामी ज्ञान प्राप्त करून देऊ शकतो.

- समाजशास्त्र, इतिहास, मानववंशशास्त्र आणि मानसशास्त्र या शाखांचा अभ्यासक्रमात अधिक समावेश केल्यास विद्यार्थ्यांमध्ये समाजाभिमुखता, नैतिक मूल्ये तसेच सांस्कृतिक संवेदनशीलता विकसित होईल.
- LIS आणि सामाजिक शास्त्र विभागांमधील संयुक्त प्रकल्प, कार्यशाळा तसेच अनुभवाधारित उपक्रम विद्यार्थ्यांना बहुविषयक दृष्टिकोन विकसित करण्यास मदत करतातयामुळे त्यांचा संशोधनवृत्तीचा . .विकास होऊन व्यावहारिक कौशल्ये अधिकाधिक परिपक्व होतात
- NEP 2020 मध्ये अधोरेखित केलेल्या बहुविषयकता, कौशल्याधारित शिक्षण आणि लवचिक अभ्यासक्रमाच्या तत्त्वांचा अवलंब LIS शिक्षणात करणे आवश्यक आहेयामुळे अभ्यासक्रम अधिक . परिणामकारक, विद्यार्थीकेंद्री आणि समाजाभिमुख होईल.
- डिजिटल साधने, डिजिटायझेशन आणि मुक्त शैक्षणिक साधने )OER) विकसित करून ती विद्यार्थ्यांसह संपूर्ण समाजासाठी उपलब्ध करणे आवश्यक आहे यामुळे ज्ञानाचा मुक्त प्रवाह सुलभ होईल आणि .LIS सेवांचा सामाजिक परिणाम अधिक व्यापक व परिणामकारक ठरेल.
- विद्यार्थ्यांना भारतीय ज्ञानपरंपरेवर आधारित नवीन संशोधन प्रकल्प, समुदायाभिमुख उपक्रम आणि तांत्रिक नवकल्पनांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे यामुळे . LIS शिक्षण अधिक सर्जनशील, व्यावहारिक आणि उपयुक्त ठरेल.

**संदर्भ :**


- भारत सरकार (2020). *राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020.* शिक्षण मंत्रालय. https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/NEP_Final_English_0.pdf
- राघवन, के. (2021). “भारतीय ज्ञानपरंपरा व उच्च शिक्षण : NEP 2020 दृष्टिकोन.” *जर्नल ऑफ इंडियन एज्युकेशन*, 47(2).
- जोशी, एस. (2022). “LIS अभ्यासक्रमातील सामाजिक शास्त्रांची उपयुक्तता.” *इंटरनॅशनल जर्नल ऑफ लायब्ररी स्टडीज*, 10(1).
- Magar, Jyoti. The role of Libraries as per New Education Policy . Volume 02 | Issue 02 https://www.ijsrtjournal.com/article/The+role+of+Libraries+as+per+New+Education+Policy